# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ४ था ❑ गुरूवार दि.३० जानेवारी २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## महाकुंभात मृत्यूचा मेळा

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य



मौनी अमावस्येनिमित्त गंगातिरी पवित्र शाही स्नान करण्याकरता जमलेल्या भाविकांमध्ये बुधवारी (२८/१/२५) पहाटे चेंगराचेंगरी सदृश्य स्थिती निर्माण झाली होती. यात अनेकजण गंभीर जखमी असून ८-१० भाविकांचा मृत्यू झाल्याचीही भीती वर्तवली जात आहे. याआधीही कुंभमेळ्यात अनेक चेंगराचेंगरीच्या घटना घडल्या आहेत. प्रयागराज येथे सुरू असलेल्या कुंभमेळाव्यात मोठी गर्दी पहायला मिळत आहे. मौनी अमावस्येला स्नान करण्यासाठी अनेक भाविक संगमावर जाण्यासाठी गर्दी करू लागले. त्यावेळी मोठी चेंगराचेंगरी अनेकांचा मृत्यू झाला असून भक्तांच्या सुरक्षिततेवर प्रश्न उपस्थित केले जात आहे. महाकुंभमेळ्यात मौनी अमावस्येला झालेल्या चेंगराचेंगरीनंतर भाविकांचा सर्वत्र आक्रोश दिसून आला.

महाकुंभमेळ्यातील मौनी अमावस्येचे मुख्य स्नान असल्यामुळे मोठ्या संख्येने भाविक दाखल झाले आहेत. मध्यरात्री १ वाजताच्या सुमारास संगम किनाऱ्यावर गर्दी मोठ्या प्रमाणात वाढल्याने चेंगराचेंगरी झाली. भाविक इकडेतिकडे पळू लागले. यादरम्यान अनेकजण खाली पडून जखमी झाले. संगम किनाऱ्यावर गर्दी वाढल्याने पोलीस लोकांना घाटावरुन बाजूला करत होते. त्यावेळी लोक जोरदार पळू लागले आणि स्थिती नियंत्रणाबाहेर गेली आणि मोठ्या प्रमाणात चेंगराचेंगरी झाली. या घटनेनंतर तात्काळ जखमींना रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

१९५४ मध्ये स्वातंत्र्यानंतरचा पहिला कुंभमेळा उत्तर प्रदेशातील प्रयागराज (तेव्हाचा अलाहाबाद) येथे भरवण्यात आला होता. पण या पहिल्याच कुंभमेळ्याला गालबोट लागलं होतं. ३ फेब्रुवारी २९५४ रोजी मौनी अमावस्येच्या शुभ मुहूर्तावरच पवित्र स्नानासाठी अलाहाबाद येथे भाविकांनी गर्दी केली होती. ३ फेब्रुवारी १९५४ रोजी संगम घाटावर एक हत्ती नियंत्रणाबाहेर गेल्यामुळे एकच गोंधळ उडाला, यावेळी झालेल्या चेंगराचेंगरीत तब्बल ५०० जणांना आपले प्राण गमवावे लागले होते.

१९८६ मध्ये हरिद्वारमधील कुंभमेळ्यात चेंगराचेंगरी होऊन किमान २०० लोकांचा मृत्यू झाला होता. उत्तर प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री वीर बहादूर सिंग हे विविध राज्यांतील अनेक मुख्यमंत्री आणि संसद सदस्यांसह हरिद्वारला आल्यावर हा गोंधळ उडाला होता.

२००३ मध्ये महाराष्ट्रातील नाशिकमध्ये कुंभमेळ्यादरम्यान पवित्र स्नानासाठी हजारो यात्रेकरू गोदावरी नदीवर जमले असताना चेंगराचेंगरीत डझनभर भाविक ठार झाले. चेंगराचेंगरीत महिलांसह ३९ जणांचा मृत्यू झाला होता, तर १०० हून अधिक जण जखमी झाले होते.

कुंभमेळा असो की कुठलाही धार्मिक कार्यक्रम असो भक्ताची होणारी गर्दी हा चिंता निर्माण करणारा प्रश्न आहे. भक्तांना कितीही आवाहन करा मात्र या निमित्ताने होणारी गर्दीवर ना प्रशासन ना पोलीस नियंत्रण ठेवू शकते ना भक्त. अशा घटनांपासून सर्वांनी सावध असायला पाहिजे. काही दिवसांपूर्वी तिरुपती मंदिरात चेंगराचेंगरी होवून अनेक भक्तांचा मृत्यू झाला. नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरोच्या घोषणानुसार, १९९६ ते २०२२ दरम्यान, देशामध्ये धार्मिक चेंगराचेंगरीत ३,०००हून अधिक लोकांचे प्राण गेले. ही क्षमता स्पष्टपणे आणि मोठ्या मेळावे आयोजित व्यवस्थापित संरचनात्मक संरचनांमध्ये आवश्यकतेनुसार अधोखित करते. देशातील कार्यक्रमांमध्ये अशा घटना नवीन नसल्या तरी मंदिर प्रशासन, कार्यक्रम आयोजक आणि भक्तांनी भुतकाळातील चुकांपासून धडा घेण्यात सातत्याने अपयशी ठरले आहे धार्मिक. सण, सत्संग आणि सभांमध्ये अशा घटनांमुळे देशाची प्रतिमा मलिन होते आणि भक्तांचा व्यवस्थेवरील विश्वास उडतो. केन्द्र व राज्य सरकारची अशा घटनाकांसाठी मार्गदर्शक तत्वे असूनही,सखोल अंमलबजावणी करण्याची करण्याची गरज आहे. मोठ्या प्रमाणात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करणाऱ्या जिल्हा प्रशासनाने योग्य सुरक्षा खबरदारी आणि पूर्व तयारी उपायांची खात्री करणे आवश्यक आहे. भाविकांनी देखील भावनिक भारलेल्या किंवा उन्माडी परिस्थितीत आपला जीव धोक्यात घालणे टाळावे. अशा सामूहिक मेळाव्यात सहभागींनी सावधगिरी बाळगावी आणि आवश्यक ती खबरदारी घ्यावी. ही शोकांतिका सर्व तीर्थक्षेत्रे धार्मिक केंद्रे आणि कार्यक्रमांचे आयोजक आणि भक्तांसाठी सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी एक वेकअप कॉल म्हणून काम करेल भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी आणि तीर्थक्षेत्रे आपत्तीचे ठिकाण बनू नये यासाठी शासनाने तातडीने पावले उचलली पाहिजेत.


## श्यामरावजी देशमुख यांचा स्मृतिसमारोह सोहळा


# अरविंद जगताप सांगणार गोष्ट छोटी डोंगराएवढी

ज्योतिर्मय साहित्य

**परळी वैजनाथ –** येथील कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. श्यामरावजी देशमुख यांचा स्मृतिसमारोह सोहळा दि. ३० व ३१ जानेवारी रोजी आयोजित करत आहोत. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी आनंदविभोर करणाऱ्या अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दि. ३० जानेवारी रोजी या सोहळ्याचे उद्घाटन सकाळी ११ वा. तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या शुभहस्ते संपन्न होईल. तर दि ३० जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वा. परळीकरांच्या आनंदाला उधाण आणणारे निमंत्रितांचे कविसंमेलन संपन्न होणार आहे. त्यात प्रभाकर साळेगावकर (माजलगाव), मुकुंद राजपंखे (अंबाजोगाई), अरुण पवार (परळी वैजनाथ), गोपाल मापारी (अकोला) व दिवाकर जोशी (परळी वैजनाथ) हे महाराष्ट्रातील मान्यवर कवी सहभागी होणार आहेत. हास्याचे फवारे उडवतानाच मनाला मोहविणाऱ्या गेय व आशयसंपन्न अशा कवितांचे आविष्करण यावेळी रसिकश्रोत्यांना अनुभवायला मिळणार आहे.

दि. ३१ जानेवारी रोजी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते, चित्रपट पटकथाकार, गीतकार मा. अरविंद जगताप यांचे "गोष्ट छोटी डोंगराएवढी" या विषयावर खुमासदार विनोदी शैलीत जीवन उपयोगी असे व्याख्यान ऐकायला मिळणार आहे. वास्तविक डांबिस, गल्लीत गोंधळ दिल्लीत मुजरा, गोष्ट छोटी डोंगराएवढी, कोण आहे रे तिकडे , बापरे बाप, खुर्ची सम्राट, गुलदस्ता, जय महाराष्ट्र ढाबा भटिंडा, तीन बायका फजिती ऐका, प्यार वाली लव स्टोरी, तुहीरे, पुन्हा गोंधळ पुन्हा मुजरा, गड्या आपला गाव बरा, अडगुला मडगुला अशा एकापेक्षा एक श्रेष्ठ मराठीतील चित्रपटाच्या पटकथा व असंख्य मराठी गाणी लिहिणारे अरविंद जगताप यांना या व्याख्यानाच्या माध्यमातून ऐकायला मिळणं ही परळीकर रसिकांसाठी एक मेजवानीच ठरणार आहे.





संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक अनिलराव देशमुख, अध्यक्ष संजयजी देशमुख सचिव रविंद्रजी देशमुख, कोषाध्यक्ष प्रसादजी देशमुख, प्राचार्या तथा संचालिका डॉ. विद्या देशपांडे यांच्या मार्गदर्शनानुसार या तिन्ही कार्यक्रमाचे नेटके नियोजन आयोजन समिती करत आहे. तरी या कार्यक्रमास परळी पंचक्रोशीतील बहुसंख्य रसिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.डॉ. अरुण चव्हाण, प्रा.डॉ. पंढरीनाथ गुट्टे, प्रा. डॉ. संगीता कचरे, प्रा. डॉ. विद्या गुळभिले यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आदींनी केले आहे.

# मराठी भाषा अभिजात होती, आहे आणि राहिलच !–संमेलनाध्यक्ष डॉ.तारा भवाळकर

**शतकाकडे वाटचाल करणा–या या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला महिला अध्यक्षपदाचा सन्मान केवळ पाच लेखिकांनाच मिळाला. कुसुमावती देशपांडे (ग्वाल्हेर) दुर्गा भागवत (कराड), शांताबाई शेळके (आळंदी) डॉ.विजया राजाध्यक्ष(इंदूर) डॉ.अरुणा ढेरे(वर्धा)आणि डॉ.ताराबाई भवाळकर(नवी दिल्ली) नवी दिल्ली येथे ७२ वर्षापूर्वी ५४ वे साहित्य संमेलन झाले होते,तेव्हा महाराष्ट्र राज्याची निर्मितीही झाली नव्हती,आणि अ.भा.मराठी साहित्य महामंडळही अस्तित्वात नव्हते.या ५४ व्या साहित्य संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान पंडीत नेहरु यांनी केले होते; अध्यक्ष होते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,आणि स्वागताध्यक्ष होते,काकासाहेब गाडगीळ.आता तीच पुनरावृत्ति यंदाही होत आहे.९८ व्या संमेलनासाठी उद्घाटक म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी लाभले आहेत,अध्यक्षपदाचा बहुमान डॉ.ताराबाई भवाळकर यांना मिळाला आहे.तर स्वागताध्यक्ष म्हणून शरद पवार आहेत.**

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

### विशेष मुलाखत

**प्रशांत गौतम**

**दिपाली यादव–फाळके**

लोकसाहित्य आणि बाल साहित्य; या विषयी काय सांगाल? मुळात आजच्या मुलांच्या हातामध्ये पुस्तकच कमी आहेत, मोबाईल जास्त आहेत. आजची पिढी ही इंटरनेट जगामध्ये विखुरली गेली आहे, हाच संस्काराचा धागा आपल्या लोकसंस्कृतीमध्ये आलेला आहे,तो बाल साहित्यामध्ये आहे. याच्यामध्ये आईवडीलांचे संस्कार, पालकांचे संस्कार आणि वाचन संस्कार हे फार महत्त्वाचे आहे. या अनुषंगाने तुम्ही बालसाहित्य या साहित्य प्रकाराकडे कसे बघाल ?

पहिली गोष्ट, आताच मी सांगितलं,लिहिता वाचता येणं म्हणजे शिक्षण हा मूर्खपणाचा समज आहे. दुसरी गोष्ट लहान मुलांनी पुस्तकं वाचली की, त्यांना शहाणपण येईल असं नाही. माणसं ही भोवतालच्या जगण्यातून आणि वागण्यातून शिकत असतात. मुलं ही टीप कागदा सारखी असतात, म्हणजे कुठं काय पडेल ते टिपत असतात. तोंडाने सांगायचं "बरे सत्य बोला, खरे सत्य चाला" म्हणून इथं शेजाऱ्यांशी आपली आई खोटं बोलतीये हे पोराला दिसत असेल तर पोरांनी कुठला संस्कार उचलायचा. संस्कार याचा अर्थ आपोआप उमटलेला ठसा भोवतालच्या वातावरणामधून... आणि मोठी माणसं जशी वागतात ते लहान मुलं टिपत असतात. वाचनातून वगैरे संस्कार होतात असं नसतं... आम्हाला वाचताच येत नव्हतं हो...सगळ्या पुरुषांना तरी आपल्याकडे लिहिता वाचता केव्हा यायला लागलं, इंग्रजोत्तर काळामध्ये ज्यावेळेला मिशनऱ्यांनी शाळा काढल्या त्यावेळेला सर्व जाती जमातीच्या पुरुषांनासुध्दा प्रवेश मिळाला. नाहीतर पुरुष तरी कुठे सगळे लिहू वाचू शकत होते. तर मौखिक परंपरेमधून आलेल्या मुख्य म्हणजे वर्तनामधून वागण्यामधून. मग या कथा तोंडी चालत आलेल्या होत्या. मी तुला सांगायची, तू आणखीन कोणालातरी सांगायची, आणखीन कोणाला सांगायची त्याचा प्रसार हा असा बोलत बोलत होता. तोंडो तोंडी होत होता. म्हणून आज्यांनी नातवाला सांगायची, नातवांनी आपल्या मित्रांना सांगायची, मित्रांनी आणखीन कोणाला सांगायची अस करत करत या सगळ्याला आपण बोधकथा असे म्हणतो. आणि मग त्या पुराणातल्या कथा असतात, इतिहासातल्या कथा असतात, आपल्या दैनंदिन जीवनामधल्या असतात, कधी विनोदाच्या माध्यमातून असतात, कधी एखाद्या शहाण्या माणसाच्या वर्तनातून उदा. बिरबल आणि बादशहाच्या कथा किंवा दक्षिणेकडच्या तेनालीरामच्या कथा तर त्या परंपरेतल्या चालत आलेल्या कथा असतात. त्यांच्यामधून काहीतरी बोध मिळतो, बोध म्हणजे शहाणपण, जगण्यातलं शहाणपण साधं, तर ते मिळत असतं.

संस्कृत मध्ये पंचतंत्र,हितोपदेश कथा,गुणाढ्याच्या बृहतकथाही आहेत,या विषयी सांगा. होय तर.आता संस्कृतमध्ये पंचतंत्र आणि हितोपदेश होतं मग त्याच्यानंतर त्याच्या मराठीमध्ये झाल्या, गुणाढयाच्या बृहत कथा होत्या कितीतरी कथा. आणि आपल्या घरामध्ये तर कितीतरी प्रकारच्या कथा सांगितल्याच जात होत्या.

मोबाईल मुळे आजची मुलं बिघडली ?


असे म्हणाता येणार नाही. आता पोरांच्या हातामध्ये मोबाईल आले आणि त्यामुळे पोरं बिघडली वगैरे असं काही नाही. आधी मागची पिढी बिघडली म्हणून पुढची पिढी बिघडली. मागच्या पिढीने शिक्षणाबद्दलची कप्पे बंद अशी काहीतरी समज करून घेतला आहे स्वतःचा त्यांच्यातून त्या मागच्या पिढीतून बाहेर यायला पाहिजे असं माझं मत आहे. स्वतःच्या वर्तनाचे ठसे मुलांच्या जीवनावर उमटतात. कथा वाचुन मुलं शहाणी होत नाहीत ते भोवतालचं जीवन बघत बघत शहाणी किंवा गाढव काय व्हायची ते होत असतात. आणि मोबाईल आले म्हणून कुठे बिघडलं, माध्यमं तरी बदलतच असतात. आधी मौखिक माध्यमं होतं मग आम्ही लिहायला वाचायला शिकलो. माध्यम बदललं की नाही... जे तोंडी होतं ते लेखी व्हायला लागलं. आधी आम्ही मराठीत फक्त शिकत होतो, देवनागरी लिपी आता इंग्रजी लिपीमधून शिकायला लागलो. तर त्यामुळे बदललं कुठे, माध्यम बदललं तरी ज्ञानाचा जो प्रवास आहे तो त्या भाषेमधूनयेणं हा महत्त्वाचा मुद्दा आहे की नाही. तर आता. श्राव्य माध्यम जालं, दृश्य माध्यम आलं मोबाईल आलं म्हणजे काय आलं तर डोळयांनी दिसायला लागलं, कानांनी ऐकायला यायला लागलं आणि त्याला परिणाम जास्त होतात. त्यांनी पाहिलेल्याचा परिणाम जास्त होतो. आता मग ते निर्माण करणारे लोक कसे आहेत, ते निर्माण काही लहान मुलं करत नाहीत. मोठी माणसं करतात. त्यामुळे त्याच्यामध्ये हे काही लहान मुलांनी वाचण्यासारखं पाहण्यासारखं आहे. ते मोठ्या माणसांनी निर्माण करायला पाहिजे. म्हणजे शेवटी आम्ही काय करतो हल्लीच्या भाषेत आम्ही हार्डवेअर वापरतो, सॉफ्टवेअर निर्माण करणं हे महत्त्वाचं स्कील आहे. ते सॉफ्टवेअरचे निर्माते कोण आहेत त्यासंदर्भातील ॲप म्हणता तुम्ही त्याला तर ती कोणती आहेत. तर ती निर्माण करण्याची यंत्रणा जर व्यवस्थित असतील तर त्या साधनांचाही अतिशय चांगला उपयोग होऊ शकतो. आपण ज्याला



म्हणतो मुलं कार्टून्समध्येरमतात, आता हे कार्टून्सम्हणजे काय तर विनोदी कथा असतात दुसरं काही नसतं. चित्राच्या माध्यमातून विनोदी चित्र कथा ज्याला म्हणता अशा त्या. मग त्या तुम्ही कशा निर्माण करता मुलं त्यांच्यातून बोध घेतील. प्रश्न काय आहे की तुम्ही त्यांच्या हातामध्ये काय देता. मोबाईल आला म्हणून बिघडलं नाही तर त्या मोबाईलमधून तुम्ही काय देता आणि तुम्ही त्यांना काय सवय लावता, घरातली मोठी माणसं म्हणून तुम्ही स्वतः त्यामध्ये काय बघता ... घरातला बापच जर त्यामध्ये ब्लु फिल्म बघत असेल तर तुम्ही मुलांकडून कशी अपेक्षा करणार? त्यामुळे ही संस्कार बिस्कार नावाची जी भानगड ही फक्त पुस्तकातून येत नाही. हि तुमची जी जेष्ठ मंडळी असतात ती वर्तन करत असतात, आई वडील घरातली मंडळी, शिक्षक, समाज, शेजार-पाजार त्यांच्यामधून हे संस्कार होत असतात आणि मुलं फार चतुर असतात म्हणजे आई वडीलांनी आणि मोठ्या माणसांनी चाईल्ड सायकॉलॉजी समजून घेण्यापेक्षा माझ्यामते... मुलांना आईवडीलांची सायकॉलॉजी जास्त चांगली माहिती असते आणि ती मुलं बरोबर एक्सप्लॉईट करत असतात आईबाबांना.

(क्रमशः)

## लक्षवेधी छायाचित्र....



Fan throated Lizard...

(छाया – मनोहर मंडवाले, कल्याण)










– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

## आनंदी पहाट...

### सुखाचा संबंध शरीरापुरताच मर्यादित


**ज्योतिर्मय साहित्य**

समाधानाचा संबंध हा केवळ अंतर्मनाशीच निगडीत असतो. आपण नेहमीच म्हणतो समाधान आपल्या मानण्यात असले पाहिजे. पण म्हणजे नक्की काय करायला पाहिजे? जेणेकरून समाधान प्राप्त होईल. संपूर्ण जग सुंदर आहे, फक्त तसे पाहायला हवे; प्रत्येक नाते जवळचे आहे, फक्त ते उमजायला हवे; प्रत्येक गोष्टीला अर्थ आहे, फक्त तसे समजायला हवे, प्रत्येक वेळेत समाधान आणि आनंद आहे फक्त तसे जगायला हवे. आपण आपल्या उणिवा दूर करत गेलोत आणि प्रत्येक बाबतीतील जाणीव करून घेत गेलोत कि समाधान मिळायला सुरुवात होतेच. पण आपण आपल्यांत काही उणिवा आहेत ह्याची जाणिवाच करून घेत नाहीत, त्यामुळे असमाधानी राहतो.

जगी सर्व सुखी असा कोण आहे? का बरे असे म्हणावे लागते? जगात सुखी असणाऱ्यांची संख्या खरेच नगण्य आहे का? अर्थात हे सर्व काही आपल्या बघण्याचा दृष्टीकोन ठरवत असतो. जसा चष्मा लावावा तसे दिसते. आपला दृष्टीकोन जेव्हढा महत्वाचा असतो, तेव्हढाच आपल्याला दृष्टी कोण देतो, तो देखील तितकाच महत्वाचा असतो. आपला प्रत्येक विचार आपल्याला काही विशिष्ठ अनुभूती देत असतो. अनेकदा आपण विचारांची सुरुवातच नकारात्मकतेने करत असतो. आपल्याला अमुक एखाडे काम जमणारच नाही, तमुक एक गोष्ट तशी असूच शकत नाही इत्यादी प्रकारच्या नकारत्मक विचारांचा थेट परिणाम आपल्या अंतर्मनावर, वर्तनावर, कालांतराने व्यवहारावर होऊ लागतो. अर्थातच होणारा परिणाम देखील नकारात्मक असल्याचे आपल्याला अनुभवायला येते. सुख म्हणजे नक्की काय असते.....? ते केवळ ज्याचे-त्याने अनुभवल्यावरच समजू शकते. तसे बघितले तर सुखाचा संबंध शरीराशी निगडीत असतो.

## बाजी जिंकून देणारी माणसं ...

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

**ज्योतिर्मय साहित्य**

प्रसंग तीन

लक्ष्मणाला इंद्रजित शक्तीअस्त्र सोडून मूर्च्छित करतो. त्याचेही प्राण संकटात असतात. यावेळी रामासह सगळे हतबल होऊन बसलेले असताना, हनुमंताचे सुषेण वैद्याला घेऊन येणे आणि नंतर त्याच्या सल्ल्याप्रमाणे द्रोणागिरीवरील औषधी वनस्पती आणण्याकरिता जाणे. तो पर्वतच उचलून आणणे.

या सारख्या अनेक प्रसंगात हनुमंत हा रामाला बाजी जिंकून देणारा ठरला आहे. रामाला बाजी जिंकून देणारी दुसरी व्यक्ती आहे. बिभीषण. बिभीषण रामरावण युद्धाच्या वेळी अनेक गोपनीय आणि महत्वाच्या गोष्टी रामलक्ष्मणाला सांगतो. त्यामुळेच त्यांना युद्धात विजय मिळवणे सोपे होते. अशीच मदत सुग्रीव, नल, नील, जांबुवंत यांची सुद्धा आहे.


अशाच पद्धतीने महाभारतात देखील पांडव हे धर्माने आणि न्यायाने चालणारे आहेत. पण त्यांना बाजी जिंकून देणारी व्यक्ती आहे श्रीकृष्ण. श्रीकृष्ण वेळोवेळी त्यांना मोलाचा सल्ला देतो आणि मार्गदर्शन करतो. जसा रावण आणि त्याचे पुत्र शक्तिशाली असतात तसेच कौरव आणि त्यांच्या बाजूने लढणारे पितामह भीष्म, द्रोणाचार्य, कृपाचार्य आदी मंडळी असतात. शिवाय कर्णासारखा अत्यंत धुरंधर योद्धा त्यांच्या बाजूने असतो. अशा वेळी त्यांच्यावर विजय मिळवणे कठीणच झाले असते. पण इथे त्यांना ही बाजी जिंकून देणारा कृष्ण आहे. अर्जुन जेव्हा युद्धाच्या वेळी हतबल होतो, धैर्य गाळून हताशपणे बसतो, तेव्हा त्याच्यातील वीरवृत्तीला, क्षात्रवृत्तीला आणि सद्सद्विवेकबुद्धीला जागृत करण्याचे काम श्रीकृष्ण गीता सांगून करतो. आणि नंतर अर्जुन लढायला प्रवृत्त होतो. पांडव युद्ध जिंकतात.



आजही नावं कदाचित वेगळी असतील पण रावण, दुर्योधन यासारख्या दुष्ट प्रवृत्ती आपल्यासमोर उभ्या ठाकतात. अशा व्यक्तींना प्रतिष्ठा ही प्राप्त झालेली असते. अशा व्यक्तींशी तुम्ही आम्ही एकटे लढू शकत नाही. त्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन लढावे लागते. काही शत्रू दृश्य असतात आणि काही शत्रू अदृश्य. दृश्य शत्रूंशी लढणे एक वेळ सोपे असते. पण अदृश्य शक्तींशी लढण्यासाठी आपल्या मनाची तयारी करावी लागते. संयम, धैर्य, चिकाटी, सहनशीलता आदींचा यावेळी शस्त्र म्हणून उपयोग होतो. काही वेळा जवळचेच लोक आपले छुपे शत्रू असू

शकतात. तर काही वेळा आपल्याच अंतरातील काम, क्रोध, मत्सर, असूया हेही आपले शत्रू असतात. अशा वेळी अर्जुनही आपणच असतो आणि कृष्णही आपणच. आपल्या धैर्याची अशा वेळी परीक्षा होते. अशा प्रसंगी आपल्याला बळ देण्यासाठी चांगले विचार, चांगले ग्रंथ, सद्गुरू मार्गदर्शन करतात. मात्र अशा वेळी निराश न होता आपल्या सत्य आणि धर्माच्या मार्गावर वाटचाल सुरु ठेवायची असते.

**(क्रमश:)**



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

**ज्योतिर्मय साहित्य**


दशक पहिला समास सहावा

### श्रोतेस्तवन

जय जय रघूवीर समर्थ

प्रभुरामचंद्र हे समर्थाचे सद्गुरू होते. सद्गुरूच्या आज्ञेनुसार समर्थानी समाजाला सत्वगुणांचा विसर पडू नये यासाठी दासबोध ग्रंथ लिहिला. प्रपंच, परमार्थ, व्यवहार आणि आत्मज्ञान याला अध्यात्मिक ध्येयवादाची साधी सोपी सरळ मांडणी म्हणजे दासबोधग्रंथ होय.दासबोध काय शिकवते तर लिनता असे म्हणावेसे वाटते.कारण बढाया मारणारे खुप असतात पण ते सद्गुणी असतीलच असे नाही. मी पणा विसरून भगवंताचा दास बनुन दासबोधाचा अभ्यास करणे म्हणजे समर्थाच्या जवळ असलेला लिनता दागिना मिळवण्यासाठी प्रयत्न करणे होय. ज्याच्या अंत:करणात वेदांचा खरा अर्थ सहजपणे वावरतो त्याच्या तोंडात म्हणजे जिभेवर सरस्वती खेळते काव्य,नाटक,कथा या साहित्य प्रकारावर भाष्य करू लागले तर समर्थ प्रत्यक्ष ब्रहस्पती सारखे वाटतात. मी मागील ऐका लेखात लिहिले आहे की समर्थ ऐवढ्या थोर पदाला पोहचलेले रामदासी होते.तरी पण त्यांच्या अंगी पराकोटीचा नम्रपणा कसा होता तर समर्थ म्हणतात पंचपक्कांनाचे ताट जरी जेवायला मिळाले पण रूचीपालटण्यासाठी साधे भोजन घेतात तद्वत वेदवाङःमय वाचणार्या नी रूचीपालट म्हणून माझा ग्रंथ वाचावा. या ऐकाच वाक्यावरून समर्थाच्या मनाचा मोठेपणा दिसुन येतो. संतांची ऊपमा दासबोध वाचणार्याला देतात''पिले जेवी वाघीणीची अंगावर खेळती तिच्या''तसे मी तर दासाचा दास आहे लेकरू आहे ऐवढे म्हणून ते पुढे म्हणतात की माझ्या सांगण्यात काही ऊणेपणा असेल तर तो मोठ्या मनाने माफ करावा.केवढी मोठी लिनता, श्रोत्यांना किती मानाचे स्थान समर्थांनी दिले हे हाव्या समासात दिसुन येते.

श्री राम जय राम जर जय राम



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**


## नाम व विकल्प !

**ज्योतिर्मय साहित्य**

नाम घेऊ लागले की विकल्प उठतात आणि ते घेण्याबद्दलची निष्ठा कमी होते, याला काय करावे ? अशी तक्रार आपण सर्वसाधारणपणे करतो; पण असे होण्यातच नामाचे महत्त्व प्रस्थापित होते हे आपल्या लक्षात येत नाही. मनुष्य नाम घेऊ लागला की विकल्पांना असह्य होते, आणि आता हा नाम घेऊ लागला, आता आपली धडगत नाही अशा धास्तीने त्यांची चळवळ चालू होते, आणि मनुष्याला नामापासून परावृत्त करण्याचा ते प्रयत्न करतात. विकल्प हे अती सूक्ष्म आहेत. त्यांचे उच्चाटन करायला त्यांच्यापर्यंत पोहोचणारा आणि तितकाच सूक्ष्म असा उपाय पाहिजे. तो उपाय म्हणजे भगवंताचे नाम. एखाद्या बिळात सर्प शिरला तर त्याला बाहेर काढण्याकरिता त्याच्यापर्यंत पोहोचून त्याला तिथे राहणे असह्य करील असाच उपाय करणे जरूर असते. बाहेरून कितीही आरडाओरडा केला तरी त्याचा उपयोग होत नाही. बिळात धूर किंवा गरम पाणी सोडले की तो बाहेर येतो. त्याप्रमाणे नाम घेतले की विकल्प उठतात, म्हणजे विकल्पांच्या मूळ ठिकाणापर्यंत नामाची आच जाऊन पोचली असे ठरते. तर मग नाम घेऊ लागल्यावर विकल्प येऊ लागले तर गांगरून न जाता, हे सुचिन्ह आहे असे समजून विकल्पांच्या उच्चाटनाची गुरूकिल्ली मिळाली अशा जाणिवेने, जास्त आस्थेने नाम घेण्याचा निश्चय करावा हाच त्याला उपाय. नामाबद्दल सुरूवातीला सर्वांचीच वृत्ती साशंक असते, पण आपण सतत नाम घेत गेल्यानेच विकल्प कमी होतात. कोणतीही गोष्ट अभ्यासानेच साध्य होत असते. आज खरी भक्ती नाही म्हणून भगवंताचे स्मरण नाही; आणि भगवंताचे स्मरण ठेवण्याचा अभ्यास केल्याशिवाय खरी भक्ती येत नाही. शहाण्या माणसाने उगीच विकल्प न लढविता भगवंताचे स्मरण ठेवायला आरंभ करावा. विकल्प जाऊन भगवंताचे संकल्प उठू लागले की आपले काम झाले.

आपण रस्त्याने चाललो की नको ती माणसे भेटायचीच; पण आपण आपले नाम चालू ठेवावे. तसे, विकल्प आले तर नाम सोडू नये. पण गंमत अशी होते की, वाईट मनुष्य भेटला आणि आपण त्याच्याकडे लक्ष द्यायचे नाही असे म्हटले तरी, तो मुद्दाम खाकरतो आणि आपले लक्ष वेधतो. अशा वेळी त्याच्याकडे पाहूनही आपण दुर्लक्ष करतो. त्याचप्रमाणे विकल्पांनी आपले लक्ष ओढून घेतले तर नावडीने लक्ष द्यावे पण आपले नाम सोडू नये. शंका घ्यायचीच झाली तर नाम चालू ठेवून घ्या, म्हणजे ते नामच शंकांचे निरसन करील आणि विकल्पांनाही हळूहळू पायबंद घालील.

९. पुष्कळ केलेले शंकेने व्यर्थ जाते. आपण नाम सोडणार नाही हे नक्की ठरविले की आपली वृत्ती नि:शंक होतेच होते.



अरुण वि. देशपांडे-पुणे
9850177342

## आनंदाची लेणी

मित्र हो नमस्कार,

नववर्ष २०२५ सुरू झाले आहे, आणि या वर्षारंभीच्या

जानेवारी महिन्यापासून माझ्या वाचकांसाठी नव्या लेखमालेची सुरवात करण्याचा हा अक्षर-योग '', मोठा आनंददायी आहे.

मित्र हो-

मनाचा मनाशी संवाद नेहमीच आनंद देणारा असतो,

आपल्याला तो साधता आला पाहिजे. या संवादाचे माध्यम समक्ष भेटीचे असो, पत्राद्वारे असो किंवा आजच्या आधुनिक माध्यमे जसे व्हाट्सप, मेसेंजर, इन्स्टंग्राम ''यासारखे असो, परस्पर संवाद होणे महत्वाचे आहे.

या संवाद साधण्याचा उद्देश आपल्या मनाला आनंद देणे आहे. हा सहजसुलभ आनंददायी उपाय जरूर करून पहा.

आपल्या मनात असलेल्या आठवणी या देखील खूप आनंद देणाऱ्या असतात, मरगळलेल्या मनाला उभारी मिळते ती याच आठवणींचा आनंद घेण्यात हरवून गेल्यावर. आनंदी आठवणी या नेहमीच दुःखद आणि नको त्या आठवणी विसरून जाण्यास आपल्याला नेहमीच मदत करीत असतात.हा उपाय करणे आपल्याच हातात असते, पण इथे दुःख कुरवाळत बसण्यात वेळ घालवणाऱ्याना हा उपाय करण्याचे सुचतच नाही. ''तुझे असुनी तुजपाशी ''असा प्रकार असेल तर, माझ्या सारख्या मित्राला या गोष्टीची आठवण करून द्यावी लागते.

''पोटापाण्यासाठी चाकरी, नोकरी करणे'' हा तर जगण्यासाठी करावा लागणारा अटळ असा व्यवहार आहे. व्यवहार म्हटले की यात ''भावनांना थारा नाही '' हे सिकृत आहे. तरी पण रुक्ष-कठोर जगात भावनांना किंमत आहे, याचा विसर पडू देऊ नये.

भावनाहीन रुक्ष जगात अनेक वेळा भावना भारी पडतात, कारण संकटसमयी दरवेळी पैसा काम करीत नसतो, तर भावनेने मदत करणारी माणसे धावून येतात ''त्यांच्या मदतीने भीषण संकटातून मुक्त होता येते'',

अशा माणसांच्या आठवणी सावलीसारख्या कायम सोबत असतात. ही माणसे कधीच कुणासमोर येत नाहीत, उपकार केल्याच्या भावनांचे प्रदर्शन ते करीत नाहीत.

अशा उपकारकर्त्यांची आठवण मनात प्रसन्न ज्योती सारखी तेवत ठेवा. अशा आनंद -आठवणी मनाला भारावून टाकणाऱ्या असतात.

मित्रांनो, आपल्या जगण्यातील आनंद कशा कशात आहे'' हे सांगण्यासाठी तर ही लेखमाला ''आनंदाची लेणी'' सुरू केली आहे.

हे लेख वाचून तुम्हीच म्हणाल -

अरेच्या ! या बोअर रुटीन मध्ये पार विसरून गेलोय या गोष्टींना'' !

तर यापुढे नियमित भेटू या आपण.

आजचा पहिला लेख म्हणजे तुमच्या माझ्या संवाद भेटीचा आरंभ आहे. यात लेखमालेत आपल्याला आनंद देणाऱ्या अनेक गोष्टींची आठवण मी करून देणार आहे. तुमच्या प्रतिक्रिया आवर्जून कळवा.

भेटूया नव्या लेखात.



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**प्रस्तावना :** भारतीय वाङ्मयाच्या इतिहासात जसे कथा, आख्याने, व्याकरण ग्रंथ, उच्चारणशास्त्र ग्रंथ, तत्त्वज्ञानपरक ग्रंथ यांचे स्थान आहे, त्याच प्रमाणे नीतीशास्त्राच्या ग्रंथांचे देखील महत्वपूर्ण असे स्थान आहे. नीतीशास्त्रीय वाङ्मयात विशेषत: माणसाने चांगले जीवन जगण्याकरीता "काय करावे आणि काय करू नये" या विषयी प्रतिपादन केलेले असते. प्राचीन भारतीय साहित्यात भर्तृहरिविरचित-नीतिशतकम्, कामंदकीय नीतिसार, कौटिल्याचे अर्थशास्त्र इत्यादी ग्रंथांचा समावेश होतो.

भर्तृहरि हे एक यशस्वी राजे होते. त्यांच्या कालखंडाविषयी विद्वानांमध्ये एकमत नाही. काही विद्वान त्यांचा काळ इसवी सन ७८ सांगतात. तर काही विद्वान त्यांचा कालखंड इसवी सन ५४४ सांगतात.

त्यांनी नीतिशतकम, वैराग्यशतकम्, शृंगारशतकम् अशी शतक काव्ये तसेच वाक्यपदीयम् हा शास्त्रीय ग्रन्थ यांची रचना केली आहे.

नीतिशतकम् या ग्रंथात त्यांनी १०० पेक्षा अधिक श्लोकांमधून सज्जनांची लक्षणे, मुर्खांची लक्षणे, विद्वानांची लक्षणे, कर्माचे महत्व, सत्कर्माचे महत्व, सुसंगतीचे महत्व इत्यादी विषयांवर उद्बोधक विचार मांडले आहेत. शिक्षक, विचारवंत, अभ्यासक, प्रवचनकार, कीर्तनकार आणि पालक अशा सर्वांसाठीच उपयुक्त असे हे श्लोक आहेत. यातील निवडक श्लोक, त्यांचे अर्थ आणि ह.भ.प. डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर यांचे निरुपण आजपासून वाचकांसाठी खास प्रकाशित करण्यात येत आहेत.

प्रसह्या मणिमुद्धरेन्मकरवक्त्रदंष्ट्रान्तरात्
समुद्रमपि सन्तरेत् प्रचलदूर्मिमालाकुलम्।
भुजङ्गमपि कोपितं शिरसि पुष्पवद्धारयेन्
न तु प्रतिनिविष्टमूर्खजनचित्तमाराधयेत्।।

अर्थ – हे शक्य आहे की, कोणी मगरीच्या मुखातील दातांमधून रत्नही बाहेर काढू शकेल. कोणी प्रचंड लाटांनी खवळलेला समुद्र पार करू शकेल. कोणी कृद्ध सापाला फुलाप्रमाणे आपल्या मस्तकावर धारण करू शकेल. पण दुराग्रहदुषित मूर्ख व्यक्तीच्या चित्ताला कोणीही संतुष्ट करू शकत नाही. या श्लोकात भर्तृहरींनी दुराग्रही व्यक्तीविषयी सांगितले आहे. ते म्हणतात की, एक वेळ मगरीच्या मुखातील दातांमधून रत्न बाहेर काढणे सोपे आहे, एक वेळ समुद्रात लाटा खवळत असतानाही समुद्र पार करणे सोपे आहे, एक वेळ कोपलेल्या सापाला फुलाप्रमाणे आपल्या मस्तकावर धारण करणे सोपे आहे, परंतु दुराग्रहाने दुषित अशा मूर्ख व्यक्तीला कोणीही संतुष्ट करू शकत नाही. कोणीही त्यास समजावून सांगू शकत नाही. आपण अशा व्यक्तीला कितीही समजावण्याचा प्रयत्न केला, तरीही त्याचा काही एक उपयोग नसतो. त्याच्या अंगी असलेल्या दुराग्रहामुळे तो समजून घेऊ शकत नाही. त्याने त्याचे मंतव्य निश्चित केलेले असते. त्या नुसारच प्रत्येक गोष्ट आहे, असावी, असलीच पाहिजे अशा मनोवृत्तीत तो वावरत असतो. त्यावर काहीही उपाय नसतो, असे भर्तृहरी येथे सूचवितात. अत्यंत यथार्थ आणि वास्तव पद्धतीने भर्तृहरींनी या ठिकाणी दुराग्रही व्यक्तींविषयीचे चित्र सोदाहरण मांडले आहे.

स्वायत्तमेकान्तहितं विधात्रा
विनिर्मितं छादनमज्ञतायाः।
विशेषतः सर्वविदां समाजे
विभूषणं मौनमपण्डितानाम्।।

अर्थ –

ब्रह्मदेवाने मूर्खाच्या हितासाठी त्यांच्या मूर्खतेचे आवरण म्हणून मौनाची निर्मिती केली आहे. मौन हा मूर्खाच्या अधिकारातील गुण आहे. हा गुण विद्वानांच्या सभेत मूर्खासाठी अलंकार सिद्ध होतो.

'' मौनं सर्वार्थसाधनम्। '' अर्थात मौन सर्व गोष्टींचे साधन आहे; असे म्हटले जाते. मनुष्य बोलला की, त्याच्या वाणीवरून त्याची गुणवत्ता लक्षात येते. म्हणून मौन म्हणजे जणू काही गुणहीन माणसांचे आवरण आहे. मौनावर मूर्खांचा विशेष अधिकार असतो. विद्वज्जनांच्या मांदियाळीत मौन हा गुण मूर्खांसाठी अलंकारासारखा सिद्ध होतो.



## आरोग्य संजीवनी

### डाळिंब खाण्याचे हे आहेत १४ फायदे

**ज्योतिर्मय साहित्य**

डाळिंबांमध्ये कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह मोठ्या प्रमाणात असतात. डाळिंबाच्या दाण्यांचाच नव्हे, तर साल, पाने, फुले, बिया, मुळं या सर्वच भागांचा औषधामध्ये वापर करतात, चला तर मग या बहूगुणकारी डाळिंबाचे फायदे जाणून घेऊ.



चिरतारुण्य टिकवण्यासाठी रोज एक डाळिंबाचे सेवन करावे.

अपचन, आम्लपित्त, ताप या कारणांनी जर तोंडास दुर्गंधी येत असेल तर डाळिंबाचे दाणे चावून चावून खाल्ल्यास दुर्गंधी निघून जाते.

शरीर मजबूत, काटक व सुंदर बनविण्यासाठी डाळिंब रस व आवळा रस एकत्र करून त्यामध्ये खडीसाखर घालावी व आठ दिवस उन्हात ठेवावे, तयार झालेले सरबत रोज १ कपभर प्यावे.

घसा दुखणे, तोंड येणे हे आजार झाले असतील तर डाळिंबाच्या सालीच्या काढ्याने गुळण्या कराव्या.

यांमध्ये होणाऱ्या श्वेत व रक्त प्रदरावर डाळिंबाची साल गुणकारी ठरते. ही साल तांदळाच्या धुवणात वाटून द्यावी

मूळव्याधीमध्ये जर रक्त पडत असेल तर डाळिंबाच्या सालीचे चूर्ण नागकेशरमध्ये घालून द्यावे यामुळे रक्त पडण्याचे बंद होते तसेच अशक्तपणा आला असेल तर डाळिंबाचा रस प्राशन करावा.

ताप आला असेल तर डाळिंब खावे, तापामुळे शरीरामध्ये वाढलेली उष्णता त्यामुळे कमी होते.

डाळिंब हे रक्तवर्धक आणि शक्तिवर्धक आहे, ज्यांना रक्ताची कमतरता म्हणजे ॲनिमिया आहे. त्यांनी रोज एक डाळिंब खावे.

अपचन, पोटात गॅस होणे, शौचास साफ न होणे या तक्रारींवर डाळिंब फायदेशीर ठरते.


जुलाब होत असतील तर डाळिंबाच्या सेवनाने ते लगेच थांबतात.


डाळिंबाचा रस प्यायल्यानं रक्ताभिसरण क्रिया सुधारते.

बाराही महिने डाळिंबाचे औषधी गुणधर्म उपयोगात आणण्यासाठी दाडीमावलेह, दाडीमादीघृत इ. डाळिंबापासून बनवलेल्या औषधांचा वापर करावा.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

# किती वेळ आहे अजून

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आजच्या या भागात रवींद्रनाथ टागोरांना आपल्या घरातच समृद्ध सांस्कृतिक पार्श्वभूमी कशी लाभली ते आपण पाहणार आहोत. त्यातूनच त्यांचे विविधांगी आणि अत्यंत समृद्ध असे व्यक्तिमत्व कसे विकसित होत गेले हेही आपल्या लक्षात येईल.

टागोरांच्या काळात ब्रिटिश सत्ता भारतात स्थिरस्थावर झाली होती. बंगालमधील शहरी भागात इंग्रजांच्या अनेक गोष्टींचे अनुकरण करण्यात धन्यता मानणारा नवशिक्षित वर्ग होता. बंगालमधील लोककला, लोकनाट्ये, लोकगीते इ. गोष्टींना इंग्रजी नाटकांप्रमाणे अत्याधुनिक स्टेज, पडदे, सजावट आदी गोष्टी नव्हत्या. पण त्यातील कला, अभिनय आणि शब्दफेक मात्र पहिल्या दर्जाची होती आणि प्रेक्षकांच्या काळजाला हात घालणारी होती. पण इंग्रजांना याची जाण नसल्याने आणि त्यांना ते जाणून घ्यायचेही नसल्याने त्यांनी या ग्रामीण बंगालमधील लोककलांना ग्रामीण, उठवळ आणि रानटी अशा प्रकारचा शिक्का त्यावर मारला. इंग्रजी शिक्षण घेऊन नुकतेच शिक्षित झालेल्या शहरी लोकांना सुद्धा मग आपल्या देशातील, प्रांतातील ही लोककला क्रूड, अनपॉलीश्ड वगैरे वगैरे वाटायला लागली. पण बंगालच्या ग्रामीण भागात या लोककला आपले अस्तित्व टिकवून होत्या. कोलकात्यासारख्या शहरी भागातील वर्ग मात्र इंग्रंजांच्या नाट्यपरंपरेचे अनुकरण करण्यात धन्यता मनात होता. शहरी आणि ग्रामीण भागात पडणारी ही दरी रवींद्रनाथांच्या फार लवकर लक्षात आली होती. या सगळ्या गोष्टींचे मूळ इंग्रजी शिक्षणात आहे असे त्यांचे मत झाले होते.

कोलकात्याजवळील टागोरांचे निवासस्थान जोराशंको वाडी म्हणजे कला, संस्कार आणि वारसा यांची पाठशाळाच होती. टागोरांच्या घरातील मंडळी आणि त्यांचे पूर्वज कलांचे चाहते होते. कलेचा कोणताही प्रकार त्यांना वर्ज्य नव्हता. जितक्या तन्मयतेने त्यांच्या घरी भजने गायिली जात, तितक्याच समरसतेने लोकगीते, नृत्य, नाट्य इ. चा सुद्धा आस्वाद घेतला जाई. त्यांच्या घरातील पुरुष कुठल्या ना कुठल्या तरी कलेत निपुण होते. कोणाच्या हाती चित्रकाराचा कुंचला असायचा तर कोणाच्या हाती लेखणी. कोणाच्या हाती एखादे वाद्य असायचे तर कोणी अभिनयात निपुण होता. धार्मिकतेचे उगीचच अवडंबर नव्हते. टागोरांच्या जोराशंको वाडीत एक विद्वज्जन समागम सभा भरत असे. या सभेसाठी साहित्यिक, तत्वज्ञानी आणि कलावंत मंडळींची हजेरी मोठया प्रमाणात असायची. यात नाट्य, काव्य, नृत्य आणि विविध प्रकारच्या कलाविषयांवर मुक्त चर्चा होत असे.

त्या काळात मुलींना, स्त्रियांना नाटकात काम करण्यास बंदी होती. मुलींनी नाटकात काम करणे, नृत्य करणे म्हणजे जणू फार मोठा अपराध होता. धर्म बुडवण्यासारखेच होते. (क्रशम:)

# दिल्लीत फडकणार मराठी साहित्याची पताका

## चपराक प्रकाशन; तब्बल २५ पुस्तकांचे संमेलनात प्रकाशन

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**नाशिक –** दिल्ली येथे होत असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात उत्तमोत्तम पुस्तके प्रकाशित व्हावीत यासाठी अनेक प्रकाशकांचे सातत्याने प्रयत्न सुरू होते. यात 'चपराक प्रकाशन'ची वैविध्यपूर्ण विषयांवरील सर्वाधिक पंचवीस पुस्तके प्रकाशित होत असल्याची माहिती प्रकाशक आणि दिल्ली साहित्य संमेलनाचे ग्रंथ प्रकाशन समितीचे अध्यक्ष घनश्याम पाटील यांनी दिली. नाशिकच्या शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान देणारे सावानाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके यांचे पुस्तकानुभव हे वेगळ्या धाटणीचे पुस्तक आहे. यात १८३० ते १९१० या कालखंडातल्या निवडक पन्नास दुर्मीळ पुस्तकांची ओळख करून देण्यात आली आहे. मुंबईतील काशिनाथ माटल यांनी कोविडच्या काळात ज्यांनी निरपेक्षपणे काम केले अशा कोविडयोद्ध्यांच्या प्रेरक कथा लिहिल्या आहेत. त्यांचा त्यावरील सावट हा कथासंग्रह आणि बेवारस हा दुसरा एक कथासंग्रहही प्रकाशित होतोय. ज्येष्ठ कवी अनंतराव घोगले यांचा सोनचाफा हा द्विभाषिक कवितासंग्रह आहे. त्यांच्या कविता मोडी आणि





देवनागरी लिपित एकाचवेळी, एकाच पुस्तकात प्रकाशित होत आहेत. शिक्षणतज्ज्ञ संदीप वाकचौरे यांच्या शिक्षणविषयक पुस्तकमालेतील दहा पुस्तके आजवर प्रकाशित झाली आहेत. एकच विषय, एकच लेखक आणि एकच प्रकाशक अशा मालिकेतील शिक्षणावर बोलू काही आणि शिक्षणरंग ही समारोपाची दोन महत्त्वपूर्ण पुस्तके प्रकाशित होत आहेत.

मुंबई महानगरपालिकेचे निवृत्त आयुक्त गिरीश गोखले यांचे अरे सरकार सरकार हे अनुभवकथन, कराडचे लेखक सुहास कोळेकर यांनी त्यांच्या महाविद्यालयीन जीवनासंदर्भात लिहिलेले रॅगिंगचे दिवस हे अनुभवकथन, सुरेखा बोर्हाडे यांनी भारतवर्षातील ६७ कर्तृत्ववान महिलांचा आढावा घेतलेला देदीप्यमान शलाका हा लेखसंग्रह, चंद्रलेखा बेलसरे यांचा ओव्हरटेक हा भयकथासंग्रह, सातारचे लेखक डॉ. राजेंद्र माने यांचे मनापासून हे ललित लेखांचे पुस्तक, मुंबईतील सिनेमालेखक व गीतकार आशिष निनगुरकर यांचा सिनेमाची पटकथा विस्तृतपणे मांडणारा लालबत्ती ते कारंबा हा पटकथासंग्रह, डॉ. बी. व्ही. कुलकर्णी यांचा परिणीता हा कवितासंग्रह, हिरालाल पगडाल यांचे पुन्हा एकदा लंडन हे प्रवासवर्णन अशी दर्जेदार पुस्तके वाचकांच्या भेटीस येत आहेत.

बसंगमेश्वरचे लेखक जे. डी. पराडकर यांनी गेल्या वर्षभरात फक्त कोकण याच विषयावरील आठ पुस्तके लिहिण्याचा आणि ती प्रकाशित होण्याचा विक्रम केला आहे. इंडिया रेकॉर्ड बुकने त्यांच्या या लेखन योगदानाची दखल घेतली. आता कोकणातील फुलांची सचित्र आणि तंत्रशुद्धा माहिती देणारे ऋतुरंग हे त्यांचे नवे पुस्तक साहित्य संमेलनात प्रकाशित होत आहे.

> दिल्लीच्या साहित्य संमेलनात पुस्तक प्रकाशित होण्याचा बहुमान मिळावा यासाठी अनेक लेखक उत्सुक होते. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातील आणि विविध साहित्य प्रकारातील दर्जेदार पुस्तके आम्ही प्रकाशनासाठी निवडली आहेत. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे हे पहिले साहित्य संमेलन असल्याने राजधानी दिल्लीत आपला आवाज आणखी सशक्त व्हायला हवा. त्या दृष्टिने उत्तमोत्तम पुस्तके निवडण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे.
>
> **– घनश्याम पाटील,**
> (चपराक प्रकाशन)

नाटककार डॉ. सोमनाथ मुटकुळे यांची तीन नाटके प्रकाशित होत आहेत. महत्त्वाचे म्हणजे संजय सोनवणी यांचे रत्नजडीत खंजिराचे रहस्य ही कुमार कादंबरी, जनार्दन देवरे यांनी लिहिलेले क्रांतिकारक सरदार भगतसिंह हे चरित्र, राजेंद्र दिघे यांचा पाखरांची गाणी हा बहुरंगी कवितासंग्रह, नांदेडच्या डॉ. भगवान अंजनीकर यांचे चरित्र स्मरण अशी काही बालसाहित्यातील पुस्तकेही प्रकाशित होत आहेत.

# संमेलनस्थळांचे नाव आता बदलणार नाही; मराठी साहित्य महामंडळ निर्णयावर ठाम

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

नवी दिल्ली येथे फेब्रुवारीत होणाऱ्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने वादाला तोंड फुटले आहे. साहित्य संमेलननगरीला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्याचा निर्णय झाल्यानंतर आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी संमेलनाचे उद्घाटन करणार असल्याचे निश्चित झाल्यानंतर संमेलनस्थळाला महाराष्ट्रासाठी आणि मराठीसाठी योगदान देणाऱ्या इतर व्यक्तींची नावे देण्यासंदर्भात मागणी सुरू झाली आहे.

संमेलनस्थळाचे नाव आता बदलणार नाही यावर अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ ठाम आहे. मात्र या नावांचा समावेश इतर कोणत्या पद्धतीने करता येईल यावर विचार सुरू आहे. या संदर्भात ३ जानेवारी रोजी होणाऱ्या महामंडळाच्या बैठकीमध्ये विचार करण्यात येईल. मात्र संमेलनाचा मूळ उद्देश या वादामध्ये हरवू नये तसेच समाजातील वातावरण खराब होईल अशाही मागण्या येऊ नयेत, अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त होत आहे.

संमेलनस्थळाला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव वगळता इतर कुणाचेही नाव आता देण्यात येणार नाही, असे महामंडळाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. संमेलनस्थळाचे नाव बदलण्यासंदर्भात महामंडळाकडे थेट मागणी झाली नसून आयोजक संस्थेकडे फोन आले आहेत, असे महामंडळाकडून सांगण्यात आले. या पार्श्वभूमीवर आयोजक संस्थेचे पदाधिकारी आणि त्यांचे काही नातेवाईक यांनाही मोठ्या प्रमाणात गेल्या दोन दिवसांमध्ये फोन गेल्याचे सरहद या संमेलन आयोजक संस्थेचे संस्थापक संजय नहार यांनी सांगितले. यातील ९० टक्के फोन विनंतीचे होते असेही ते म्हणाले. संमेलनस्थळाबद्दल आलेल्या धमकीच्या फोनसंदर्भात कोणतीही तक्रार दाखल करण्यात आली नसून त्यांच्या मागणीबद्दल आयोजक संस्था, महामंडळ यांना पत्र पाठवण्यास सांगण्यात आले आहे.

आयोजक संस्थेकडे आलेल्या मागण्यांमध्ये काहींनी नवी दिल्लीमध्ये संमेलन होत असल्याने महाराष्ट्रासाठी योगदान दिलेल्या साहित्यिक, कलाकारांचा सन्मान व्हावा असे मत व्यक्त केले आहे. काहींनी संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ,






संत तुकाराम, संत रामदास, बहिणाबाई चौधरी, आचार्य अत्रे, स्वातंत्र्यवीर सावरकर, पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगूळकर, वि. वा. शिरवाडकर आणि माजी संमेलनाध्यक्ष या सर्व व्यक्तींचे फोटो पोस्टरवर दिसावे अशीही मागणी करण्यात आली आहे. आद्यक्रांतिकारक उमाजी नाईक यांचे कार्य दुर्लक्षित राहिले असून त्यांच्या कार्याची आणि बलिदानाची जाणीव सामान्यांना होण्यासाठी संमेलनस्थळी त्यांचा सन्मानाने उल्लेख व्हावा, अशी मागणी आद्यक्रांतिवीर उमाजीराजे नाईक युथ फाऊंडेशनने केली आहे.

# मुलांना निखळ आनंद देणारी बालकविता संग्रह : अटर का पटर

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**





कवी विठ्ठल जाधव यांचा अटर का पटर हा लकवितासंग्रह नुकताच इसाप प्रकाशनाने प्रसिध्द केला असून या बालकविता मुलांच्या भाव जीवनाशी एकरूप होणाऱ्या आहेत.मुलांना निखळ आनंद देणाऱ्या या बालकविता असून त्या मुलांना सहजसुलभतेने आकलन होतील,अशा शब्दांत रचलेल्या आहेत.तसेच या बालकवितेला लय,नाद आणि ताल असल्यामुळे गोडवा निर्माण झाला आहे.त्यामुळे या बालकविता मुलांना नक्कीच पसंत पडतील,अशा आहेत. उदा.निसर्गाच्या सान्निध्यात वसलेल्या गावाचे नेटके नि समर्पक चित्र रेखाटताना कवी डोंगर कवितेत लिहितो :

हिरवा डोंगर डोंगरात गाव
गावात नदी नदीत रस्ता ..

.. अशीच गंमतीशीर निवडणूक ही बालकविता असून तीमधून कवीने कल्पकतेने रंगवलेले कासव नि सशाच्या निवडणूकीचे चित्र मुलांना सुखावून टाकणारे आहे :

एकदा ससा राहिला निवडणूकीला उभा
कासव होते विरोधी घेई ते पाण्यात सभा ..

.. तसेच ही बालकविता मुलांना आनंद तर देतेच ; पण त्या सोबतच त्यांना काहीएक महत्त्वाचा बोधही अगदी नकळतपणे देताना दिसते.उदा. पैसा आणि मंत्र कवितेतून कवी मुलांच्या मनावर वृक्षारोपणाचे महत्त्व तर बिंबवतोच पण त्यांना विचार करण्यासही प्रवृत्त करताना दिसतो : मनीप्लॅन्ट लावून येतील का पैसे ? आपण आपले करु नये हसे ..

**पुस्तक परीक्षण**

**उमेश मोहिते, अंबाजोगाई**

.. याशिवाय या संग्रहातील काही कविता मुलांच्या मनातले विचार,त्यांच्या भाव-भावना आणि त्यांना कुतुहलापोटी पडणाऱ्या विविध प्रश्न अधोरेखित करणाऱ्या आहेत.उदा. शोध या कवितेतून मुलांचे बालसुलभ कुतुहल आणि जिज्ञासेतून त्यांच्या मनात पडणारे प्रश्न व्यक्त करताना कवी म्हणतो :

देव,देव राहतो कुठे सांग आई,सांग आई
चंद्रावरती,सुर्यावरती आभाळी की धरेवरती ?

.. अशीच मुलांच्या मनातली मोठ्या माणसांच्या वागण्याविषयीची ठसठस सांगा,मी काय करु ? कवितेतून कवीने उजागर केली आहे :

हे म्हणती तिकडे जा ते म्हणती इकडे जा
यांचं ऐकू की त्यांचं ऐकू सांगा,मी काय करू ..

.. याशिवाय या बालकवितासंग्रहात आपल्याला मामाचा मळा भेटतो,नदी भेटते,डोलणारे बाळ भेटते,बोलणारे झाडदेखील भेटते आणि ते सारे बालमन खूष करून जातात आणि वाचकमनाला या कवितेचा लळा लागतो.थोडक्यात कवी विठ्ठल जाधव लिखित अटर का पटर मधील कवितेत मुलांच्या आचार-विचार आणि भाव-भावनांचे देखणे नि साजेसे प्रतिबिंब पडले असून या बाल कविता बालकांना त्यांच्या विश्वाचा पुनःप्रत्यय देणाऱ्या आहेत.या कवितांचे विषय मुलांच्या जिव्हाळ्याचे असून आधी म्हटल्यानुसार मुलांना सहजतेने त्यांचे आकलन होईल,अशा या सुंदर बालकविता आहेत.या बालकविता मुलांना कधी हसवतात,तर कधी एखादा सुंदर विचार अगदी सहजपणे त्यांच्या मनात रुजवून जातात.एकूणात रंजकतेमधून काही उपयुक्त असा बोध देणाऱ्या या बालकविता असून मलपृष्ठावर जेष्ठ बालसाहित्यिक श्री.एकनाथ आव्हाड म्हणतात त्याप्रमाणे या कविता मुलांना आवडतील आणि त्यांच्या ओठांवर त्या सहजतेने रुळतील , यात शंका नाही.हेच कवी विठ्ठल जाधव यांच्या लेखणीचे यश आहे.

अटर का पटर – ( बालकविता )
कवी – विठ्ठल जाधव
प्रकाशक – इसाप प्रकाशन , नांदेड मो.९४२१४४२९९५
पृष्ठे – ५६
मूल्य – १५० रु.
मुखपृष्ठ – शीतल शहाणे

# करुया संकल्प नववर्षांचा

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**



**विद्यार्थ्यांशी हितगुज**

लक्ष्मण जगताप,
बारामती
संपर्क : ९४२३२ ४९९९६

सरत्या वर्षाला निरोप देताना नववर्षाच्या स्वागतासाठी आपण तयार आहोत. झाले गेले विसरुनी जावे,पुढे पुढे चालावे यानुसार सरत्या वर्षातील कटू गोष्टींचे विस्मरण करुया. प्रत्येकाचे जीवन आनंदमय होवो अशी सदिच्छा मनात ठेवून पुढे जाऊयात. मुलांना नवीन वर्षात करता येण्यासारखे काही संकल्प.

१.नवीन वर्षात माझ्या वेळेचे योग्य नियोजन करेन.
२.नियमितपणे माझी शाळा ,अभ्यास याकडे लक्ष देईन.
३.वाचन, लेखन, खेळ चित्रकला किंवा माझा छंद याकडे जाणीवपूर्वक लक्ष देईन.
४.माझ्या परिसरातील शेतकरी ,सैनिक अन्य कारागीर यांना भेटून त्यांच्या मुलाखती घेईन.त्यातून त्यांच्या अडचणी समजून घेईन.
५.आईवडील शिक्षक यांनी दिलेल्या आज्ञांचे पालन करेन.
६.नियमितपणे व्यायामासाठी वेळ काढून माझ्या आरोग्याची काळजी घेईन.
७.फारच गरज असेल मोबाईल वापरणार अन्यथा नाहीच.
८.रोज ठराविक वेळ वाचनासाठी देईन.
९.पर्यावरणाच्या रक्षणासाठी माझे योगदान देईन.
१०.रोज नवीन काहीतरी शिकण्याचा प्रयत्न करेन.

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

एकेकाळी अस्मादिकाने जवळपास दररोज किमान पंचवीस किलोमीटर सायकलवर प्रवास करत आपलं शिक्षण पूर्ण केले यावर आज माझा स्वतःचाच विश्वास बसत नाही.

गरोबा मैदान ते सदर येथील पुर्वीचे चित्रकला महाविद्यालय हे अंतर जवळपास नऊ किलोमीटर म्हणजे जाऊन येऊन अठरा किलोमीटर अधिक मित्रांकडे जाणे-येणे किंवा रंगसाहित्य आणणं हे ही ओघाओघाने आलेच.

जागोजागी चढ उतार असणाऱ्या नागपूर शहरात सायकल चालवणे म्हणजे एक दिव्यच....

त्यातही नागपूर येथील कडक उन्हाळ्यात तुमची सायकल महिन्याभरात दोन चार वेळा हमखास पंक्चर होण्याचे संकट उभे ठाकलेलेच असायचे. एवढं तरी बरं पंक्चर जोडणारी व दुरुस्तीची कामे करणारी मंडळी चौकाचौकात तुमच्या दिमतीला हजर असायची.



**गंमत जंमत**


रखरखत्या उन्हात तो म्हणजे संकटकाळी देव उभा ठाकल्यासारखे वाटायचं. तरी पण पंक्चर एक का दोन या बाबत मनात विचार चालूच असायचे आणि सोबत त्याच्या नकळत हात खिशात घालून सुट्या नाण्यांचा पुरते पैसे आहे की नाही हा अंदाज घेणेही पध्दतशीरपणे चालू असायचं.

घामामुळे एकमेव असलेल्या विटकरी रंगाच्या सदर्यावर घामाच्या बुरशीची रांगोळी मिरवणे मी अजूनही विसरलेलो नाही.

सायकल का असली किस्सा तो अभी आगे हैं...

७६/७७ साली मी वार्षिक क्रीडा महोत्सवात स्लो सायकलींग स्पर्धेत भाग घेतला कारण दुसरं तर काही येतंच नव्हतं. फार फार तर क्रिकेट या सांघिक खेळात सहभाग असायचा. त्यात ही विशेष करून क्षेत्ररक्षक म्हणून माझी निवड व्हायची. प्रसन्ना बेदी पेक्षा मी चांगले क्षेत्ररक्षण करू शकतो असं माझ्या सहकारी मित्रांचे मत होते

बघतो तर काय मी स्लो सायकलींग मध्ये चक्क पहिला आलों हो .... बरं यांत नांव जरी प्रविण असले तरी माझे प्राविण्य वगैरे काही नव्हते हे स्पष्टपणे कबुल करतो. स्पर्धेच्या एका टप्प्यावर मी सर्वात पुढे म्हणजे मागें होतों. पण मागें असलेले स्पर्धक एका जागी स्थिर करण्याच्या उद्योगापायी फाउल होऊन बाद होत गेले आणि शेवटी उरलेला मी पहिला आलो. विद्यार्थी दशेत अभ्यासाव्यतिरिक्त मिळालेलं एकमेव बक्षीस म्हणून मिरवण्याचे भाग्य मला लाभले याचे तुम्हाला नसले तरी मला निश्चितच अभिमान आहे.







# घरत गणपती – आत्मभान जागृत करणारा दोन पिढीतील संघर्ष...

**ज्योतिर्मय साहित्य**

मागच्या काही दिवसात मी जुनं फर्निचर या चित्रपटाचे जसे जमेल तसे परिक्षण केले म्हणण्या पेक्षा तो चित्रपट मला कसा वाटला हे मांडण्याचा प्रयत्न केला होता. परिक्षण, समिक्षा, करणं हे आपल्या आवाक्याबाहेरचे असल्या सारखे वाटते.म्हणून मी जमेल तसे लिहिण्याचा प्रयत्न केला होता. मागच्या काही दिवसात प्राईम टाईम, युट्यूब, डिस्ने हाँटस्टार सारख्या ओ.टी.टी. प्लँटफाँर्म वरती काही चित्रपट पहायला मिळाले, मिळत आहेत. आपल्याला जे आवडतील ते चित्रपट कितीही वेळा पाहायला मिळू लागले. त्यामुळे काही सुंदर कथानकांचे, सुंदर चित्रिकरणाचे, अवर्णनीय चित्रिकरण स्थळे असे सर्वांगसुंदर चित्रपट पाहता आले. त्यातीलच एक नवीन चित्रपट म्हणजे ‘‘घरत गणपती‘‘ हा होय. एक कौटुंबिक कथानक असलेला, कथा, पटकथा, संवाद, सिनरी आणि सर्व पात्रांनी त्यांच्या भूमिकेला योग्य न्याय दिलेला पहायला मिळाला.

चित्रपटाची अप्रतिम सुरुवात आहे. घरत हे आडनाव मुळी कोकणी आहे. त्यामुळे कोकणच्या विहंगम दर्शनाने चित्रपटाची सुरुवात होते. कोकणला लाभलेल्या किनारपट्टीचं दृश्य मन मोहून टाकतं. आप्पा आणि माई यांच्या घरातला सात दिवसांच्या गणपतीचे आगमन आणि आप्पांचा नातू केतनचं आगमन हे एकाच वेळी होतं.तसंच घरात आगमना वेळीच केतनची दिल्लीतील मैत्रीण क्रितीच (हिंदी भाषीक) ही आगमन गणपती बाप्पांच्या गजरात होतं.

याच गौरी गणपती उत्सवा भोवती हे कथानक फिरत रहाते. या उत्सवा बरोबरच तरुणाई ज्येष्ठांच्या मनात उत्सव मर्यादित करण्याच्या मनसुब्याला ब्रेक लावून ज्येष्ठांचे आत्मभान जागृत करते. ही खूप सुंदर कल्पना या चित्रपटात मांडून नात्यांचा खूप मस्त फुलोरा फुलवत ठेवला आहे.

आप्पा माई यांची, भाऊ (संजय मोने) शरद (अजिंक्य देव) आणि कुसुम ही मुलं. अहिल्या आणि सुनंदा या सुना तर केतन, नेहा, निनाद, जीतू, क्रिती आणि भाऊची मुलगी दिपाली व जावई ह्या सर्वांनी सुंदर भूमिका साकारल्या आहेत.

चित्रपट कथानकाची सुरुवात गणपती आगमनाने होते खरं पण खर्च करणाऱ्या मुलाला (शरदला) मीच खर्च करतो.घराची कौलं रंगरंगोटी, बागेला मीच पैसा पुरवतो याचा अहंकार शरद अहिल्या यांच्या मनात ठाण मांडलेला असतो. गणपती आल्या पासूनच पुढच्या वर्षी पासून दिड दिवसांचाच गणपती ठेवायचा यावर विचार मंथन, कुरबुरी चालू झालेल्या असतात. त्यात केतनची मैत्रीण म्हणून आलेली क्रिती ही खरच मैत्रीण आहे की अजून काही दोघात चालू आहे यावर ही घमासान होतेच.पण हिच क्रिती भाऊ आणि शरद यांना नारळ सुपारीच्या बागेत एकत्र आणून बालपणाच्या आठवणीतून मनातील किल्मिश दूर करते. लहानपणी मोठ्या भावानेच वहिरीत पोहायला शिकवलेले असते. दोघेही भाऊ आहे असे विहिरीत उड्या मारत सगळं विसरून जातात. क्रिती निनादला,दिपालीला, नेहाला, आपलसे करुन घेते.तिच एक वाक्यं खूप महत्त्वाचे वाटते. ती म्हणते ‘‘मै परिवार को टुटना नहीं देख सकती‘‘. दिड दिवसाचा गणपती व क्रितीच्या वरुन झालेल्या भांडणात क्रिती जेव्हा परत जायला निघते तेव्हा माई दहिसाखर हातावर घालायला म्हणून आणायला जातात आणि चक्कर येऊन पडतात अर्थात हे सोंगच असतं.कारण क्रिती परत जावी असं तिला आप्पांना वाटत नसत.हा सिन भावूक बनवतो.

शेवटी माई आप्पा किनाऱ्यावर नारळ सुपारीच्या बागेत एकमेकांची समजून घालतात. माई म्हणते आपण दोघे या घराचे खांब आहोत. खचून जावू नका,परंपरेचं कुणावर ओझं टाकू नका.हात आप्पांच्या पाठीवरून फिरवताना आपलेही डोळे पाणावतात.शेवटी माई म्हणतात मुलांनो दिड दिवसांचा गणपती म्हणताय तर ठिक आहे. पण दिड दिवसांचा म्हंटल्यावर गौरीचे आगमनच असणार नाही. तर मग यावर्षी गाव जेवण द्या. आणि पुढच्या वर्षी पासून दिड दिवसांचा करा.मग गाव जेवण होतं.

क्रितीच्या सोज्वळ स्वभावाने घरातील निम्म्या व्यक्तींची मन तिने जिंकलेली असतात. आता माई अहिल्येला म्हणते अगं तुम्ही दोघी सुना म्हणून येणार तेव्हा मलाही नको वाटत होतं.मुलांवरचा हक्क संपणार असं वाटत होतं.पण मीच मनाची समजून घातली की, चला दोन लहान मैत्रणी येत आहेत म्हणून.असं तू ही समज.तुझ्यात असणाऱ्या अहंकाराला संपवून सून नाही तर मैत्रीण येते आहे असं समज.हा सल्ला मोठा ठरतो.शेवटी सर्वांच्या मनात दिड दिवसांच्या ऐवजी सातच



**दत्ता तरलगट्टी सर**
मुक्त पत्रकार, पंढरपूर.
९८८१६२९०४८

दिवसांचा गणपती ठेवायचा हा तरुणांचा निर्णय गणपतीला निरोप देताना गार्हाणं घालायला सुरुवात शरद करतो.आणि एक एक जण गार्हाणं घालून सर्वांनी होय महाराजा म्हणून साद देणं सुरु होतं.शेवटी केतन गार्हाणं घालतो घरतांची पुढची पिढी ही परंपरेची पालखी खांद्यावर आनंदाने घेईल आणि पुढच्या वर्षी सुद्धा सात दिवसांचाच गणपती ठेवेल.... म्हणून गार्हाणं घालतो तेव्हा सर्वच जण होय महाराजा म्हणून साद देतात.

यामधील गाणी ही सुंदर आहे. कोकणचं दर्शन गीताच्या वेळी घडतं.काही सिन खूप आकर्षक ठरतात. उदा.आप्पा माईचे किनाऱ्यावरील संभाषण, क्रिती सायंकाळी किनाऱ्यावर उभी असते,तरुणाईचे गाणं,गौराईचे आगमन,असे काही सिन खूप छान वाटले.तर चित्रपटातील काही काही संवाद मनावर कोरले गेले. उदा.मै परिवार को टुटना नहीं देख सकती.एकीच बळ दे रे महाराजा. अगं गणपती सजावट पहात नाही तो भक्ताचा भाव पहातो.पुढची पिढी ही हुशार आहे त्यांना उत्तरे द्यावीच लागतील.बाप सर्वच वेळा बरोबर असतोच असे नाही, मुलगा सुध्दां बापाचे डोळे उघडू शकतो.अहंकाराची साडेसाती कुणालाही लागू शकते अगदी आईला ही.बाईपण म्हणजे काय गं?अगं आईपण येत नाही तोपर्यंत असतं ते बाईपण!! ही वाक्ये मनावर कोरली जातात.

नवज्योत बांदिवडेकर यांचा हा




चित्रपट दोन एक तास कोणत्याही माणसाला खुर्चीवर खिळवून ठेवेल. असा हा चित्रपट आहे. दिड दिवसा ऐवजी सात दिवसांचा गणपती ठेवायचा यावर एकमत झाल्यावर. म्हणून म्हणतो,‘‘ चित्ती असु द्यावे समाधान,‘‘ या वाक्या बरोबरच ‘‘कुटुंबाची ही गंमत शक्य असेल त्यांनी त्यांनी अनुभवायला हवी‘‘.ही दोन्ही वाक्ये सुध्दा प्रेक्षकांना विचार करायला लावतात.खरोखरच सर्वांग सुंदर चित्रपट सर्वांनी सहकुटुंब पहायला हवा असा हा ‘‘घरत गणपती‘‘ चित्रपट आहे. नवज्योतजी अशीच सर्वांग सुंदर चित्रपटाची निर्मिती तुमच्या कडून आणि तुमच्या टिमकडून झालेली आम्हाला पहायला नक्कीच आवडेल.

# नकली गजरा

**ज्योतिर्मय साहित्य**



आज मनात आलं. नकली गजरा केसात माळावा. काठपदर साडीवर तो छान खुलून दिसेल. अबोली रंग त्याचा आणि तो ही अबोलच होता. रंग जरी देखणा पण त्याला सुगंध कुठेच नव्हता. त्याचा स्पर्शही असा तसाच. जो मोगरा, जुई अन शेवंतीची फुले माळताना असायचा. तो आज कुठेच जाणवला नाही.त्याचं असणं फक्त तो मागे पुढे लुडबुड करीत होता त्यावरून जाणवत होतं. तो गजरा कसा का असेना आणि तो ही मी स्वतःच माळलेला. पण त्याच्यामुळे मनात विचारांचा गोंधळ सुरू झाला. खरं ते खरंच असतं आणि खोटं ते खोटंच ना. खऱ्याचा रंग,सुगंध,स्पर्श, टवटवीतपणा, आणि संपतानाहीआजूबाजूला दरवळ सोडून जाणं हे खोट्याला कधीच जमणार नाही. तरी आपण भाळतोच ना त्याच्यावर. आणि मागचा पुढचा विचार न करता सुसाट पळत सुटतो. अन अखंड डुबून जातो त्याच्या प्रेमात .जवळ गेल्यावर खरं रूप दिसतं .त्यात समर्पण, त्याग कुठेच नसतो.तो नुसताच देखावा असतो हे जेव्हा कळते.तेंव्हा मात्र हळहळ, कळकळ होते. चडपड करत बाहेर पडण्याचा पोकळ प्रयत्नही केला जातो आणि पडलोच तर वेळ फार पुढे निघून गेलेली असते. खरा काही काळ का सोबत असेना तो मानवी आयुष्याच्या वास्तवाची जाणीव करून देत असतो. क्षणभंगुर आयुष्याचा आनंद कसा घ्यावा हे स्वतःच्या जगण्यातून तो इतरांना दाखवत असतो. त्याचे सुकलेले शरीरही अत्तर कुपी बनून जाते. कुपीचा शोध घ्यायचा की देखाव्याला भुलून जायचं हे मात्र ज्याच्या त्याच्या हातीच असतं.पण एक मात्र ध्यानी घ्यावं, हे अनमोल आयुष्य मात्र पुन्हा पुन्हा नसतं.

**– रंजना सानप**
मायणी (सातारा)

# आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलून टाकणार – एक भाकर तीन चुली

**ज्योतिर्मय साहित्य**

‘‘कष्टाला पर्याय नाही; माणसानं फक्त लढत राहावं, विजय मिळतोच.‘‘ पारूचं आयुष्य म्हणजे संघर्षाचं महाकाव्य ही कादंबरी वाचायला मला एवढा उशीर का लागतोय, हा प्रश्न मीच मला वारंवार विचारला तेव्हा उत्तर मिळालं की, स्वसंवाद आणि स्वयंप्रेरणेला वेळ हा लागणारचं अर्थात तो लागायलाही हवा, जेव्हा तुमच्या हातात स्व–परिक्षणाचं हत्यार असतं. आणि खरं सांगते, वाचन करताना अगदी तेच झालं.. एवढ्या तेवढ्या कारणाला हिरमुसणारी पिढी ठेचायला हे पुस्तक प्रभावी ठरणार नाही तर ठरतंय.. कारण या पुस्तकाची खमकी नायिका हे बळ कळत नकळत पेरतेय, असं मी म्हणेन..

पारू ही कादंबरीची नायिका, एक उच्च जातीतील विधवा स्त्री, जी समाजाच्या क्रूर परंपरांच्या विळख्यात सापडली आहे. तिच्या जीवनाचा संघर्ष वाचताना डोळ्यांत पाणी आल्याशिवाय राहणार नाही. पतीच्या मृत्यूनंतर तिच्या वाट्याला आलेली उपेक्षा, समाजाच्या जखमा, आणि आर्थिक संकटांमधून ती हिमतीने लढत राहिली.




**स्मिता सुनिल**
‘‘लाईफ बीट्वीन द लाईन्स‘‘ या पुस्तकाच्या लेखिका.

पारूचं आयुष्य म्हणजे संघर्षाचं महाकाव्य. भाकरीसाठी चाललेली धडपड, कुत्र्यासारख्या समाजाकडून सतत होणारा छळ, आणि तरीही हार न मानता तिने आपल्या लेकरासाठी शिक्षणाचा प्रकाश उभारला. तिच्या म्हणण्याप्रमाणे, ‘‘कष्टाला पर्याय नाही; माणसाने फक्त लढत राहावं.’’ पारूची जिद्द हिमालयासारखी उंच आणि अढळ होती. तिच्या पायाने पंचक्रोशीतील प्रत्येक रस्त्यावर ठसा उमटवला. घराचे छप्पर नसले, मायेचा आधार मिळाला नाही, तरीही तिचं आयुष्य म्हणजे सतत चालणाऱ्या वादळासारखं होतं. तिच्या संघर्षाने दाखवलं की माणसाने कितीही प्रतिकूल परिस्थिती असली तरी जगायचं. समाजाच्या जखमांना सावरणाऱ्या पारूने सिद्ध केलं की दुःख आणि संघर्षांतूनही माणूस स्वतःचं जीवन घडवू शकतो. ही कहाणी केवळ प्रेरणा नाहीये तर आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलून टाकणार, यात शंका नाही.. लेखक देवा झिंजाड दा तुझं खुप कौतुक, हे मनाची उलथापालथ करणारं आणि भांभावून सोडणारे शब्द आमच्या पुढ्यात दिले यासाठी.


# अ.भा. साहित्य संमेलन दिल्लीसाठी रंजना सानप याच्या कवितेची निवड

**ज्योतिर्मय साहित्य**



**सातारा** : ९८ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन दिल्ली येथे आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनात कवी कट्ट्यामध्ये रंजना सानप यांची ‘‘मी कुण्याब्याची धनीन‘‘ या कवितेची निवड झाली आहे.

आतापर्यंत रंजना सानप यांनी ५० हून अधिक साहित्य संमेलनात निमंत्रित कवी म्हणून कविता सादर केल्या आहेत. ९६व्या अखिल भारतीय संमेलन वर्धा येथेही रंजना सानप यांच्या कवितेची निवड झाली होती. याशिवाय त्या राज्यभर कथाकथन व विविध विषयावर व्याख्यान देत असतात. विविध वर्तमानपत्रातून त्यांचे साडेतीनशेहून अधिक कथा कविता, लेख प्रकाशित झाले आहेत. सातारा आकाशवाणीवर विविध कार्यक्रमासाठी त्यांनी लेखन केले आहे. आतापर्यंत त्यांची पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत आणि तीन पुस्तके प्रकाशित होण्याच्या मार्गावर आहेत. त्यांना आतापर्यंत साहित्यिक व शैक्षणिक कामासाठी साठहून अधिक पुरस्कार मिळाले आहेत. या त्यांच्या निवडीसाठी कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे सौ. राजश्री मुंडे ताई, पुणे येथील मा. उपमहापौर केशव दादा घोळवे, ग्रामविकास विभाग मंत्रालय मा. उपसचिव रघुनाथ नागरगोजे व विविध स्तरातून त्यांचे या निवडीसाठी अभिनंदन व कौतुक होत आहे.




# बदामी लेण्यातील शिल्पाविष्कार

**ज्योतिर्मय साहित्य**

किष्किंधा नगरी अर्थात कर्नाटकातील हंम्पीच्या वाटेवर जाताना आवर्जून भेट देण्याजोगे शहर म्हणजे बदामी. चालुक्य कालीन राजवटीच्या काळातील या शहराचे नाव वातापी. या शहरातील लेण्या पाहण्याआधी अनेकजण बनशंकरी या देवीचे दर्शन घेतात. शाकंभरी देवीचेच हे रुप आहे. या देवीच्या मंदिरासमोरील तळे आणि त्याच्या तीनही बाजुने असलेल्या दगडी ओवऱ्या मंदिर प्रवेशात प्रसन्नतेची भर घालतात. मंदिराच्या प्रवेशव्दारातून आत गेल्यावर उजव्या बाजुच्या दिपमाळेजवळ भाविकांनी पेटवलेले छोटे दिवे आणि धूप– उदबत्त्यांनी वातावरण सुगंधित झालेले असते . दगडी खांबाच्या पार्श्वभूमीवर देव्हाऱ्यातील गर्भगृहात विराजमान देवीची मुर्ती पाहून मनाला समाधान लाभते. त्यानंतर पर्यटकांचे पाय बदामीच्या लेण्यांकडे वळतात. जागतिक वारसा स्थळाचा दर्जा प्राप्त झालेल्या या लेण्या पाहताना मराठवाड्यातील वेरुळच्या लेण्यांची हमखास आठवण येते. विस्तीर्ण जलाशयाला खेटून विशालकाय दगडांमध्ये कोरलेल्या या लेण्यांमध्ये हिंदु देवदेवतांच्या शिल्पकृती मन मोहून टाकतात. लेण्यांच्या प्रवेशमार्गात सुरुवातीला उजव्या बाजूला तांडवनृत्य करणाऱ्या शिवाचे दर्शन घडते. विविध शस्त्रे आणि वाद्य धारण केलेल्या



**लेखक**
**भारतीपती विजयराजे**

बहुभुजा शिवाच्या बाजुला गणपती आणि नंदी आहेत. सहाव्या शतकातील उत्कृष्ट शिल्पाविष्कार असलेल्या या लेण्यांमध्ये शिवासोबतच विष्णू , हिंदु देवदेवता तसेच वामन अवतार, वराह अवतारांची देखणी शिल्पे आढळतात. जैन धर्माच्या प्रतिमाही या लेण्यांमध्ये पहायला मिळतात. पायरी मार्गाने चार भागात विभागलेल्या या लेण्यांच्या मध्यावरुन तलाव आणि संपूर्ण बदामी शहराचे विहंगम दृश्य दिसते. लेण्या उतरुन खाली आल्यावर तलावाच्या काठाने मंदिर समुह आहे. त्यापैकी भुतनाथाचे मंदिर हे विशेष आहे. शेवटच्या बाजुला तलावाच्या पाण्याला खेटून शेषशायी विष्णुचे छोटेसे मंदिर आहे. **(क्रमशः)**




हे जनरल संपादक व प्रकाशक श्री.संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे–४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559